वाचले-: 1. श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी हल्ली रा.नासिक याचा दिनांक 11.12.2017 व 27.02.2018 रोजीचा अर्ज.
2. उप विभागीय अधिकारी तळोदा यांचे कडील आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995.
3. नगर रचनाकार, नंदुरबार यांचेकडिल पत्र क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ता.शहादा/संन 63/ भु.क्र.16 ते 20 1134/ दि. 12.10.2017 चे पत्र व त्यासोबतचा मंजुर अभिन्यास
4. तहसिलदार शहादा यांचा अहवाल क्रमांक/गावठाण/कावि 48/2018 दिनांक 10.1.2018
5. इकडील कार्यालयीन आदेश क्रमांक /बिनशेती/कावि 85/2018 दिनांक 29.01.2018

क्रमांक/गावठाण /कावि 243 /2018
उप विभागीय अधिकारी, कार्यालय शहादा
दि.२०/03/2018

आदेश

उपोद्दघोतात नमुद क्रमांक 2 अन्वये उप विभागीय अधिकारी तळोदा यांचे कडील आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995. अन्वये मौजे कुकडेल ता शहादा जि. नंदुरबार येथील सर्व्हे क्रमांक 63 क्षेत्र 0.97 हि शेतजमिन रहिवास प्रयोजनार्थ बिनशेती कडे वर्ग करण्यात आली आहे.

उपोद्दघोतात नमुद क्रमांक 5 अन्वये मौजे कुकडेल ता शहादा जि. नंदुरबार येथील सर्व्हे क्रमांक 63 मधील प्लॉट क्रमांक 16+17+18+19+20अ+20ब एकुण 06 प्लॉटचे क्षेत्र 928.95 चौ.मि. चे इकडील कार्यालयीन आदेश क्रमांक /बिनशेती/कावि 85/2018 दिनांक 29.01.2018 अन्वये एकत्रिकरण करण्यात आले असुन सर्व्हे क्रमांक 63 मधील प्लॉट क्रमांक 16+17+18+19+20अ+20ब चे एकत्रिकरणानंतरचे एकुण क्षेत्र 928.95 पैकी नगर रचनाकार नंदुरबार यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध. पर/ मौजे कुकडेल/ ता.शहादा/ संन.63/भु.क्र. 16 ते 20/1134/ दि. 12.10.2017 चे पत्र व सोबतचा मंजुर अभिन्यासा नुसार 173.65 चौ.मि. क्षेत्र (नियोजित इमारतीचे तळ मजल्यावरील दुकानाचे क्षेत्र) वाणिज्य प्रयोजनार्थ वापरात बदल करणेस परवानगी मिळणे बाबत अर्जदार यांनी विनंती केल्यानुसार तसेच नगर रचना कार नंदुरबार यांनी केलेल्या शिफारसीनुसार मी, उप विभागीय अधिकारी शहादा भाग शहादा मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मौजे कुकडेल ता शहादा जि. नंदुरबार येथील सर्व्हे क्रमांक 63 मधील प्लॉट क्रमांक 16+17+18+19+20अ+20ब प्लॉटचे एकत्रिकरणानंतरचे एकुण क्षेत्र 928.95 चौ.मि. क्षेत्रापैकी एकुण 173.65 चौ.मि. क्षेत्र (नियोजित इमारतीचे तळ मजल्यावरील दुकानाचे क्षेत्रासाठी) वाणिज्य प्रयोजनार्थ वापरात बदल करणेस खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

अटी व शर्ती

1. अर्जदारास उप विभागीय अधिकारी तळोदा यांचे कडील आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995. मधील व कबुलायती मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
2. नगर रचनाकार, नंदुरबार यांचेकडिल पत्र क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ ता.शहादा/संन.63/ भु.क्र.16 ते 20 / 1134/ दि. 12.10.2017 चे पत्र मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
3. प्रस्तुत क्षेत्राचा वापरातील बदला बाबत रुपांतरीत कर, बिनशेतीसारा, किंवा नगर रचनाकार यांचे कडील विकास शुल्क किंवा कोणतीही महसुली थकबाकी आदेश निर्गती नंतर निदर्शनास आल्यास सदर रक्कम अर्जदार यांना भरणे बंधनकारक राहिल.

उप विभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा

प्रति,
श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी हल्ली रा.नासिक

प्रतिलिपी-: तहसिलदार शहादा
2/- याकामी रेकार्ड ऑफ राईटसच्या नियमानुसार अधिकार अभिलेखात योग्य ती दुरुस्ती नोंद आदेशाप्रमाणे घेण्यात यावी. व त्यानुसार 7/12 उतारे इकडील कार्यालयात सादर करावे.
प्रतिलिपी-: उप अधिक्षक भुमी अभिलेख, शहादा यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उप विभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा